प्रशासकीय अधिकारी संवर्गातील
अधिकाऱ्यांची बदली व नियुक्ती.

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन आदेश क्रमांकः मत्स्यआ-२०१८/प्र.क्र.१०/पदुम-१२,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०००३२.
तारीख: ७ मार्च, २०१८.

शासन आदेश :-

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार व सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने मत्स्यव्यवसाय विभागातील प्रशासकीय अधिकारी या संवर्गातील अधिकाऱ्यांच्या पदस्थापनेत खाली दर्शविल्याप्रमाणे बदल करण्यात येत आहेत:-

अ.क्र.	अधिकाऱ्यांचे नाव	सध्या धारण करीत असलेले पद व कार्यालय	बदलीने नियुक्तीचे पद व कार्यालय	अभिप्राय
१	२	३	४	५
१.	श्री.कृष्णा.आ.पाटील	प्रशासकीय अधिकारी, प्रादेशिक उपआयुक्त मत्स्यव्यवसाय, नागपूर कार्यालय	वसूली अधिकारी, सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, मुंबई शहर कार्यालय	बदली अधिनियमातील कलम ४(५) नुसार रिक्त पदी (विनंतीनुसार).

२. श्री.कृष्णा.आ.पाटील यांनी वरीलप्रमाणे बदलीने नियुक्तीच्या पदावर तात्काळ हजर होऊन तसा अहवाल शासनास सादर करावा.

३. श्री. पाटील यांच्या बदलीने रिक्त झालेल्या पदांवर अन्य अधिकांऱ्याच्या नियुक्तीबाबतचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

४. सदर बदलीने पदस्थापना दिलेल्या अधिका-यास आपल्या नवीन बदलीने नियुक्तीच्या जागी हजर होण्यास आयुक्त मत्स्यव्यवसाय, मुंबई कार्यालय व संबंधित प्रादेशिक उपआयुक्त मत्स्यव्यवसाय, नागपूर कार्यालयाने तात्काळ कार्यमुक्त करावे.

तसेच, संबंधीत अधिकाऱ्यास नवीन बदलीने नियुक्तीच्या जागी हजर होण्यासाठी कोणत्या दिनांकास कार्यमुक्त केले आणि ते नवीन नियुक्तीच्या जागी कोणत्या दिनांकास हजर झाले याबाबत शासनास या vijay.chaudhari@gov.in ई-मेल संकेतस्थळावर त्वरित कळवावे.

५. श्री.कृ.आ.पाटील यांच्याकडे शासन आदेश दिनांक ३.२.२०१७ अन्वये दिलेल्या सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, (कर्ज व वसुली) (कनिष्ठ/प्रशासकीय) गट-अ या पदाचा दिलेला अतिरिक्त कार्यभार पुढिल आदेश होईपर्यंत चालू ठेवण्यात येत आहे.

५. संबंधीत अधिकाऱ्यास बदलीने नियुक्तीच्या पदावर हजर होईपर्यंत शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय कोणत्याही कारणास्तव रजा मंजूर करु नये. तसेच म.ना.से. (रजा) नियम, १९८१ मधील नियम-३० (सी) नुसार मूळ कार्यालयाने बदली झालेल्या अधिकाऱ्याचे कोणत्याही प्रकारचे रजेचे अर्ज स्विकारु नयेत. असे अर्ज प्राप्त झाल्यास, ते संबंधीत अधिकाऱ्यास मूळ पत्त्यावर नोंदणी पोच देय डाकेने परत करावेत. मूळ कार्यालयाकडे बदली झालेल्या अधिकाऱ्याचे रजेचे अर्ज पाठविल्यास सदर अर्जांची दखल घेण्यात येणार नाही.

६. सदरहू बदली आदेशानुसार तात्काळ नियुक्तीच्या ठिकाणी हजर न झाल्यास वा कोणत्याही प्रकारचा दबाव आणून बदली रद्द करण्याचा प्रयत्न झाल्यास, ही कृती महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम २३ चे उल्लंघन करणारी असल्यामुळे, ती गैरवर्तणूक समजून त्यांचे विरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

६. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक **२०१८०३०७१७४०१४५५०१** असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Vijay K. Chaudhari
Date: 2018.03.07 17:41:18 +05'30'

(वि.का.चौधरी)

उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. सचिव (पदुम), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
३. महालेखापाल, महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञेयता), १-मुंबई / २-नागपूर.
४. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
५. प्रादेशिक उपआयुक्त मत्स्यव्यवसाय, मुंबई/नागपूर
६. कोषागार अधिकारी, कोषागार कार्यालय, नागपूर
७. सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय (तांत्रिक), मुंबई शहर.
८. संबंधीत अधिकारी.
९. श्री.कृष्णा.आ.पाटील, वसुली अधिकारी, सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, मुंबई शहर
१०. निवडनस्ती